



रयत शिक्षण संस्थेचे,

राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.

मराठी विभाग सन २०२१ -२२

दि.२१ मे २०२२

## 'राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त ग्रंथभेट'

# अहवाल

दि.२१ मे दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त मुक्त सैनिक वसाहत कोल्हापूर येथील शा.कृ.पंत वालावलकर या प्रशालेच्या ग्रंथालयास 'शाहूंच्या आठवणी' या प्रा.नानासाहेब साळुंखे यांच्या ग्रंथाच्या १६ प्रती भेट म्हणून दिल्या. भारताचे ९ वे पंतप्रधान म्हणून राजीव गांधी यांचे कार्य उल्लेखनीय स्वरूपाचे आहे. म्हणून त्यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या मराठी विभागाने 'शाहूंच्या आठवणी' या ग्रंथाच्या प्रती शाळेस भेट म्हणून दिल्या. यावेळी ग्रंथपाल सौ.मृदुला शिंदे यांनी महाविद्यालायचे व मराठी विभागाचे प्रशालेच्या वतीने आभार व्यक्त केले. याप्रसंगी महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ.सिंधू आवळे यांनी 'शाहूंच्या आठवणी' या ग्रंथाची उपस्थिताना ओळख करून देताना म्हणाल्या की, "शाहू महाराज यांचे कार्य खूप मोठे व व्यापक स्वरूपाचे आहे. त्यांच्या कार्याची ओळख अशा स्वरूपाच्या ग्रंथांच्या माध्यमातूनच पुढच्या पिढ्यांना होणार आहे. त्यामुळे असे ग्रंथ आपल्या संग्रही असणे आवश्यक आहे." असे विचार डॉ.आवळे मॅडम यांनी व्यक्त केले. तसेच ग्रंथाचे लेखक प्रा.नानासाहेब साळुंखे यांच्याविषयी माहिती सांगितली. याप्रसंगी प्रा.अंकुश घुले, डॉ.महेश रणदिवे, प्रा.विनोद आखाडे आदी प्राध्यापक तर अमर मारुती कांबळे, तुषार भरमा मागाडे, महेश अशोक लोखंडे, तानाजी राठोड आदी विध्यार्थी उपस्थित होते.

### परिणाम/निष्पती

- विद्यार्थ्यांना राजीव गांधी यांच्या कार्याची माहीती मिळाली.
- विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण झाली.
- विद्यार्थ्यांना शाहूंच्या आठवणी ग्रंथ वाचनास प्रेरणा मिळाली.

### लाभार्थी

36







प्रा. डॉ. सिंधू जयवंत आवळे
मराठी, विभाग प्रमुख

RAJARSHI CHH. SHAHU COLLEGE KOLHAPUR

प्राचार्य,
राजर्षी छ. शाहू कॉलेज
कोल्हापूर